# भुयारी मार्गातील मेट्रोची चाचणी लवकरच घेणार

## दोन कोच आंध्र प्रदेशहून निघाले; ऑगस्टमध्ये मुंबईत

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात नव्याने सत्तेवर आलेल्या सरकारने भुयारी मेट्रो-३चे कारशेड आरेमध्येच उभारण्याचा घाट घातला असतानाच, दुसरीकडे याच मेट्रो मार्गासाठीच्या ट्रायल रनचे दोन कोच आंध्र प्रदेशमधील श्रीसिटीहून मुंबईकडे रस्ते मार्गाने रवाना झाले आहेत. ऑगस्ट महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन कोच मुंबईत दाखल होणार असून, उर्वरित सहा कोच टप्प्याटप्प्याने मुंबईत दाखल झाल्यानंतर भुयारी मेट्रोची चाचणी घेतली जाणार आहे.

कुलाबा ते सीप्झसाठीच्या डब्यांची चाचणी मरोळ मरोशी येथे करण्यात येणार आहे. मुंबईत एकूण आठ कोच दाखल होणार आहेत. त्यापैकी दोन ऑगस्टमध्ये येत आहेत. जोपर्यंत आठ कोच दाखल होणार नाहीत, तोवर ट्रायल होणार नाही. अल्स्टॉम या कंपनीने श्रीसिटी आंध्र प्रदेश येथे ८ डब्यांची ट्रेन तयार केली आहे. गाडीची त्या ठिकाणी तांत्रिक चाचणी होत आहे. आता प्रत्यक्षात चाचणी मुंबईत १० हजार किमी चालवून घेण्यात येणार आहे. त्यानंतर, कुलाबा ते सिप्झ या मार्गिकेवर ट्रेन चालविण्यात येणार आहे. चाचण्या यशस्वी झाल्यानंतर ३१ ट्रेन धावण्याकरिता उपलब्ध होतील.

### ट्रेनची चाचणी विविध मानकांवर होणार

**दहा हजार किलोमीटर अंतराच्या चाचणीदरम्यान स्पीड, ऑस्सिलेशन, इमर्जन्सी ब्रेक डिस्टन्स अशा चाचण्यांचा समावेश असेल.**

**चाचण्या तात्पुरत्या सुविधेपासून सुरू होऊन भुयारांमध्ये घेण्यात येणार आहेत.**

**प्रोटो टाइप ट्रेनच्या चाचण्या या ठिकाणी घेण्यासाठीची आवश्यक मंजुरी शासनाने दिली आहे.**



### ठळक वैशिष्ट्य

- आर्द्रता नियंत्रण, कोचच्या आत सुरक्षित आणि आरामदायक वातावरण असलेले पूर्णपणे वातानुकूलित डबे
- माहिती, जाहिरात आणि मनोरंजनासाठी एलसीडी स्क्रीन
- प्रोग्राम करण्यायोग्य डिजिटल मार्ग नकाशा सूचक
- आगीपासून संरक्षणासाठी प्रत्येक कोचमध्ये फायर डिटेक्टर, स्मोक डिटेक्टर आणि अग्निशमन उपकरणे
- प्रवासी उतरण्यासाठी प्रवासी घोषणा प्रणाली
- सौंदर्यदृष्ट्या सुखावणारी आसन व्यवस्था
- दिव्यांग व्यक्तींसाठी व्हीलचेअर ठेवण्यासाठी समर्पित जागा
- एअर सस्पेंशन - प्रत्येक डब्यात सीसीटीव्ही
- आपत्कालीन परिस्थितीत प्रवासी आणि नियंत्रक यांच्यात आवाज संवाद सुविधा